अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

# NOTICE

NO 32

दि.
25 MAY 2023

## वरीष्ठ महाविद्यालय

## प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

**एफ.वाय.बी.ए. / बी.कॉम. / बी.एस्सी./ बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स/ बी.बी.ए./ बी.बी.ए (सी.ए) /बी.व्होक (फुड प्रोसेसिंग, जर्नालिझम, डेअरी टेक्नॉलॉजी, रिटेल मॅनेजमेंट, ई.कॉमर्स, इ.)**

शैक्षणिक वर्ष **२०२३-२४** साठी प्रवेश प्रक्रिया दि. २९/०५/२०२३ पासून ऑनलाईन पध्दतीने व खालील नियमांनुसार सुरू होत आहे. यासाठी प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील फ्लो चार्ट, माहिती पुस्तक व संबंधित नोटीसेस काळजीपूर्वक वाचावेत. जेणेकरून प्रवेश घेण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. विद्यार्थ्यांनी प्रवेश कसा घ्यावा यासाठी या नोटीस सोबतचा चार्ट अगोदर अवश्य वाचावा व काळजीपूर्वक ऑनलाईन फॉर्म भरावा.

इ. १२वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी **दि. २९/०५/२०२३** पासून महाविद्यालयाच्या www.tccollege.org या संकेतस्थळावर जाऊन प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहून आपला प्रवेश दिलेल्या मुदतीत निश्चित करावा.

### थेट प्रवेश प्रक्रिया सुरू असलेले अभ्यासक्रम

१. **एफ.वाय.बी.ए.** - इ. १२ वी कला मध्ये ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त केलेल्या व प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध कोटयानुसार अनुदानित तुकडीमध्ये थेट प्रवेश सुरू आहे. ५० टक्के पेक्षा कमी गुणप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना विनाअनुदानित तुकडीमध्ये प्रवेश सुरू आहे.

२. **एफ.वाय.बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स.** - सदर कोर्स हा विनाअनुदानित तत्वावर आहे. इ. १२ वी सायन्सने बोर्डाच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना थेट ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेने प्रवेश मिळेल. **(यासाठी १२वी सायन्समध्ये मॅथ्स् विषय असणे आवश्यक आहे)**

३. **फुड प्रोसेसिंग ॲण्ड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी / डेअरी टेक्नॉलॉजी** - इ .१२वी मध्ये प्रथम प्रयत्नात किमान ६० टक्के गुणप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

४. **जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन / रिटेल मॅनेजमेंट / ई-कॉमर्स ॲण्ड डिजिटल मार्केटिंग (बी.व्होक.)** - इ. १२ वी मध्ये किमान ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम येणाऱ्यास प्रथम याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

५. बी.बी.ए./बी.बी.ए.(सी.ए.) - इ. १२वी मध्ये किमान ६० टक्केच्या पुढे गुणप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध कोटयानुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

D:\users\sddeokar\Admn\ADM.2023-2024\Admission Notice.docx

६. बी.एस्सी. – इ. १२वी शास्त्र शाखेमध्ये प्रथम प्रयत्नामध्ये ६० टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना **अनुदानित** तुकडीमध्ये उपलब्ध कोटयानुसार थेट प्रवेश दिला जाईल. तसेच इ. १२वी शास्त्र शाखेमध्ये प्रथम प्रयत्नामध्ये ६० टक्के पेक्षा कमी गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना **विनाअनुदानित** तुकडीमध्ये उपलब्ध कोटयानुसार थेट प्रवेश दिला जाईल.

७. बी.कॉम. – इ. १२वी वाणिज्य शाखेत प्रथम प्रयत्नामध्ये ७५ टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये उपलब्ध कोटयानुसार थेट प्रवेश सुरू आहे. तसेच इ. १२वी वाणिज्य शाखेत प्रथम प्रयत्नामध्ये ७५ टक्केपेक्षा कमी गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना विनाअनुदानित तुकडीमध्ये उपलब्ध कोटयानुसार थेट प्रवेश सुरू आहे.

प्रवेश फी भरून प्रवेश निश्चित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज डाउनलोड करावा. डाउनलोड केलेला प्रवेश अर्ज प्रशासन भवन येथे जमा करावा.

**– प्रवेश अर्जासोबतजोडावयाची कागदपत्रे –**

१. इ. १२ वी शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या ऑनलाईन किंवा २ झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.
२. इ. १२ वीचे मूळ गुणपत्रकाची झेरॉक्स प्रत
३. ई.बी.सी. /जात संवर्गाची फी सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर शासनाने दिलेल्या मुदतीत ऑनलाईन फॉर्म भरणे आवश्यक आहे. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
४. पी.टी.एफ./एस.टी.एफ. फी सवलतीचा संपूर्ण भरलेले सही शिक्क्या निशी अर्ज प्रवेशाच्या वेळी देणे आवश्यक आहे. (फक्त अनुदानित वर्गासाठी)
५. मागासर्गीय विद्यार्थ्यांना जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत
६. विद्यार्थ्यांचे आधार कार्डची झेरॉक्स
७. अलिकडच्या काळात काढलेला आयडेंटीटी कार्ड साईजचे २ फोटो
८. **ऑनलाईन गुणपत्रिकेवर विद्यार्थ्यांना तातुरत्या स्वरूपाचा प्रवेश दिला जाईल.**
९. **शाळा सोडलेला मुळ दाखला जमा करून व मुळ गुणपत्रिका याची छाननी झालेनंतर आपला प्रवेश कायम केला जाईल. याची नोंद घ्यावी.**

**सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी त्याच्या <u>शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या किमान १५ झेरॉक्स</u> प्रती काढून ठेवाव्यात. ऑनलाईन प्रवेश घेत असताना प्रवेश अर्जावर स्वतःचा ई-मेल आय.डी. व वापरातील मोबाईल नंबर लिहिणे अनिवार्य आहे.**

कार्यालयीन अधिक्षक

चेअरमन
प्रवेश प्रक्रिया

प्राचार्य

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

D:\users\sddeokar\Admn\ADM.2023-2024\Admission Notice.docx